

श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर




गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe इयत्ता – सातवी (13 जुलै) माझा अभ्यास Subscribe

# शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

**शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट**

## दिवस तेरा :






गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

वाचा व समजून घ्या.

टेस्ट सोडवा

# ३. तोडणी

BNVGXG

**दत्तात्रय विरकर** (१९६५) : विविध वृत्तपत्रे व मासिके यांतून कथा व कवितांचे लेखन. वाटणी, तोडणी या कथा प्रसिद्ध. ऊसतोडणी कामगारांच्या समस्यांचे वास्तव या कथांतून मांडले आहे.

वसंत व मीरा या ऊसतोडणी कामगाराच्या मुलांच्या मनातील शिक्षणाविषयीची तीव्र ओढ प्रस्तुत पाठात व्यक्त केली आहे.

**माहिती घ्या.**

- शेतीच्या खालील कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या साधनांची माहिती घ्या व नावे लिहा.
  (अ) खुरपणी.
  (आ) बांध घालणे.
  (इ) पेरणी.
  (ई) नांगरणी.


गाव सोडून गाडीत बसल्यावर सगळ्यांच्या डोळ्यांसमोर फक्त ऊस दिसत होता. निघाल्यापासून गावाकडच्या विचारानं सगळ्यांच्या मनात काहूर उठलं होतं. परक्या गावात आपण केव्हा आलो हे तारा अन् शंकरला उमगलंच नाही. सगळ्या तोडणीवाल्यांनी मराठी शाळेजवळच्या मोकळ्या जागेत गाड्या सोडल्या. बैलांच्या मानेवरचं जू खाली ठेवताच सगळी बैलं शेपटी अंगावर मारत अंग खाजवायला लागली. बायकांनी गाडीजवळच चुली पेटवल्या. बाप्या माणसांनी बैलं अन् पोरांनी बादल्या, कळश्या घेतल्या व नदीवर गेली. दामूनंही आपली बैलं नदीवरून पाणी पाजून आणली. मीरा अन् वसंतनं झिऱ्यावर पाण्यासाठी नंबर लावला होता. तारानं भाकरी थापून तव्यावर पिठलं टाकलं तेवढ्यात पोरं पाणी घेऊन आली. 'आवं पाचूंदा सोडा,' लक्ष्मीनं दिलेला आवाज दामूनं ऐकला आणि पाचूंदा सोडून गुडघ्यानं सरमड कडाकडा मोडून बैलांसमोर सारलं. तसा रामा, धोंडू, शंकर सगळ्यांनी आपआपल्या परीनं बैलांसमोर सरमड मोडून टाकलं. पिठलं-भाकरी पोटात ढकलून सगळ्यांनी अंथरुणं पसरली.


तांबडं फुटताच तारा झटकन अंग झटकून उठली. तिनं जर्मनच्या पातेल्यात चहा ठेवला. शंकर जांभई देत उठला. त्यानं अंथरुणाची वळकटी केली. तारानं तोंडावर पोचारा मारला नि बिनदांडीच्या कपात लाल चहा शंकरच्या पुढ्यात केला. 'हं घ्या, च्या घ्या.' शंकरनं चहाचा कप हातात घेतला. 'शंकर ! अरे ये शंकर...आरं मामू चिठ्ठी देऊन गेलाय, थळात जायचंय. निघाया पायजे.' दामूचा आवाज कानावर पडताच 'हा आलू.... आलू', असं म्हणून शंकरनं घटाघटा चहा पोटात ढकलला. सगळ्यांनी नदीच्या काठावर मोकळ्या रानात सामान उतरवलं अन् थळाचा रस्ता धरला. शंकर-तारानंही आपला कोयता सोबतीला घेऊन मीरा अन् वसंतला बरोबर घेतलं. आज 'ऊसतोडणी'चा पहिला दिवस असला, तरी उघड्यावर झोपून थंडीनं अंग काकडून निघतं, म्हणून दुपारीच थळातून लवकर परतायचं, असं सगळ्यांनी ठरवलं होतं. थळात पाय ठेवताच शंकरनं उसावर घाव घालायला सुरुवात केली. मीरानं मोळ्या बांधल्या. दिवस माथ्यावर केव्हा आला ते समजलंच नाही. हिरवा चारा मिळाल्यानं बैलं मस्त जोगली होती.


सगळ्यांनी वाढे टाकून शंकूच्या आकाराच्या कोप्या बांधून सामान लावलं, तसं तारानंही सामान लावून चिमणीचा उजेड करताच मीराला वसंतचं पुस्तक गवसलं. 'वश्या तुपलं पुस्तक...वश्या तुपलं पुस्तक.' मीराचा आरडाओरडा ऐकून वसंतला शाळेची आठवण झाली अन् वसंत कोपीबाहेर बसलेल्या शंकरच्या मागे जाऊन उभा ठाकला. त्यानं शंकरच्या खांद्यावर हात ठेवून विचारलं, 'दादा, मले साळांत कवा धाडणार?' थळामध्ये जोशात काम करणाऱ्या वसंतला शंकरनं पाह्यलं असल्यानं 'साळा बिळा काय बी नाय, बस

## कोनांची एकरूपता समजून घ्या.


टेस्ट सोडवा





**कृती**




आकृतीत दाखवल्याप्रमाणे 40° चे ∠LMN व ∠XYZ हे दोन कोन काढा. एक पारदर्शक कागद ∠LMN वर ठेवून बिंदूंच्या नावांसह कोनाच्या भुजा गिरवा. पारदर्शक कागद उचलून मिळालेला कोन ∠XYZ वर ठेवा. बिंदू M बिंदू Y वर, किरण MN किरण YZ वर ठेवून किरण ML हा किरण YX वर पडतो हे अनुभवा. यावरून समान मापांचे कोन एकरूप असतात हे समजते. कोनांची एकरूपता भुजांच्या लांबीवर अवलंबून नसते. कोनांची एकरूपता कोनांच्या मापांवर अवलंबून असते. ∠LMN व ∠XYZ एकरूप आहेत हे ∠LMN ≅ ∠XYZ असे लिहितात.

**हे मला समजले.**

- ज्या कोनांची मापे समान असतात, ते कोन एकरूप असतात.


- जर ∠LMN ≅ ∠XYZ तर ∠XYZ ≅ ∠LMN
- जर ∠LMN ≅ ∠ABC आणि ∠ABC ≅ ∠XYZ तर ∠LMN ≅ ∠XYZ


**चला, चर्चा करूया.**





- घड्याळात किती वाजले आहेत ? ☐
- दोन काट्यांमध्ये किती अंश मापाचा कोन झाला आहे ? ☐
- या कोनाशी एकरूप कोन घड्याळाच्या काट्यांमध्ये आणखी किती वाजता असतो ? ☐


## Understand the congruence of segment.





**Activity**




टेस्ट सोडवा

Draw two angles ∠LMN and ∠XYZ of 40° each as shown in the figure. Trace the arms of ∠LMN and the names of the points on a transparent paper. Now lift the transparent paper and place the angle you obtain on ∠XYZ. Observe that if point M is placed on Y and ray MN on ray YZ, then ray ML falls on ray YX. We can infer that angles of equal measure are congruent. The congruence of angles does not depend on the length of their arms. It depends upon the measures of those angles. That ∠LMN is congruent with ∠XYZ is written as ∠LMN ≅ ∠XYZ.

**Now I know!**

Two angles with equal measures are congruent to each other.

- If ∠LMN ≅ ∠XYZ then ∠XYZ ≅ ∠LMN.
- If ∠LMN ≅ ∠ABC and ∠ABC ≅ ∠XYZ then ∠LMN ≅ ∠XYZ.

**Let's discuss.**




(1) What time does this clock show? ☐

(2) What is the measure of the angle between its two hands? ☐

(3) At which other times is the angle between the hands congruent with this angle? ☐

टेस्ट सोडवा

Read and enact. (वाचा आणि कृती करा.) revision

Game 5

## A friendly challenge!


Form pairs. Write a wrong sentence and ask your partner to correct it. If necessary, refer to the following tables, but feel free to frame your own sentences. But remember, you must be able to correct your own 'wrong sentence'.

| | | | |
|---|---|---|---|
| Use of 'be' | I am ........ . | You are ........ . | He/She/It is ...... . |
| | We are ........ . | You are ........ . | They are ........ . |
| | I was ........ . | You were ..... . | He/She/It was ........ . |
| | We were ........ . | You were ..... . | They were ..... . |
| Use of 'do' | I do/don't ........ . | You do/don't ...... . | He/She/It does/doesn't ...... . |
| | We do/don't ...... . | You do/don't ...... . | They do/don't ......... . |
| | I did/didn't ........ . | You did/didn't ..... . | He/She/It did/didn't ......... . |
| | We did/didn't ...... . | You did/didn't .... . | They did/didn't ........... . |
| Use of 'have' | I have ........ . | You have ........ . | He/She/It has ........ . |
| | We have ........ . | You have ........ . | They have ........ . |
| Adding '-s' to verbs | I like mangoes. | You like mangoes. | He likes mangoes. |
| | We like mangoes. | You like mangoes. | She likes mangoes. |
| | | | It likes mangoes. |
| | | | They like mangoes. |

'a' or 'an'

- an apple
- a red apple
- a mango
- a golden mango
- an overripe mango

- milk
- a drop of milk
- some milk
- two cups of milk



# २. शिवपूर्वकालीन भारत

## वाचा व समजून घ्या .

इ.स.१२०६ मध्ये मुहम्मद घोरीच्या मृत्यूनंतर ऐबकाने आपल्या प्रभुत्वाखाली भारतातील प्रदेशाचा कारभार स्वतंत्रपणे पाहण्यास सुरुवात केली. ऐबक हा मूळचा गुलाम असून तो दिल्लीचा सत्ताधीश बनला. इ.स.१२१० मध्ये त्याचा मृत्यू झाला.

टेस्ट सोडवा

**माहीत आहे का तुम्हांला ?**

कुतुबुद्दीन ऐबकानंतर अल्तमश, रझिया, बल्बन, अल्लाउद्दीन खल्जी, मुहम्मद तुघलक, फिरोज तुघलक, इब्राहीम लोदी इत्यादी सुलतानांनी भारतावर राज्य केले.

इब्राहीम लोदी हा शेवटचा सुलतान होय. त्याच्या स्वभावदोषामुळे त्याला अनेक शत्रू निर्माण झाले. पंजाबचा सुभेदार दौलतखान लोदी याने काबूल येथील मुघल सत्ताधीश बाबर यास इब्राहीम लोदीविरुद्ध पाचारण केले. या लढाईत बाबराने इब्राहीम लोदीचा पराभव केला आणि त्याबरोबरच सुलतानशाहीचा शेवट झाला.

### विजयनगरचे राज्य

दिल्लीचा सुलतान मुहम्मद तुघलक याच्या कारकिर्दीत दिल्लीच्या मध्यवर्ती सत्तेविरुद्ध दक्षिणेमध्ये उठाव झाले. त्यातूनच विजयनगर व बहमनी ही दोन प्रबळ राज्ये उदयास आली.

हरिहर व बुक्क हे दक्षिण भारतातील दोघे भाऊ दिल्लीच्या सुलतानशाहीच्या सेवेत सरदार म्हणून होते. त्यांनी मुहम्मद तुघलकाच्या काळात दक्षिणेत राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन इ.स.१३३६ मध्ये दक्षिणेत विजयनगरचे राज्य स्थापन केले. आजच्या कर्नाटकातील 'हंपी' ही या राज्याची राजधानी होती. हरिहर हा विजयनगरचा पहिला राजा होय.

हरिहरानंतर त्याचा भाऊ बुक्क सत्तेवर आला. बुक्क याने रामेश्वरपर्यंतचा प्रदेश आपल्या आधिपत्याखाली आणला.

**कृष्णदेवराय :** कृष्णदेवराय इ.स.१५०९ मध्ये विजयनगरच्या गादीवर आला. त्याने विजयवाडा आणि राजमहेंद्री हे प्रदेश जिंकून आपल्या राज्यास जोडले. बहमनी सुलतान महमूदशाह याच्या नेतृत्वाखाली एकत्रित आलेल्या सुलतानांच्या सैन्यसंघाचा त्याने पराभव केला. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीत विजयनगरचे राज्य पूर्वेस कटकपासून–पश्चिमेस गोव्यापर्यंत व उत्तरेस रायचूर दोआबापासून–दक्षिणेस हिंदी महासागरापर्यंत पसरलेले होते. इ.स.१५३० मध्ये त्याचा मृत्यू झाला.



कृष्णदेवराय

कृष्णदेवराय हा विद्वान होता. त्याने तेलुगु भाषेमध्ये 'आमुक्तमाल्यदा' हा राजनीतीविषयक ग्रंथ लिहिला. त्याच्या कारकिर्दीत विजयनगरमध्ये हजार राम मंदिर, विठ्ठल मंदिराचे बांधकाम झाले.

कृष्णदेवरायानंतर विजयनगरच्या राज्यास उतरती कळा लागली. आजच्या कर्नाटक राज्यातील तालिकोट येथे एकीकडे आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही, बरीदशाही आणि दुसऱ्या बाजूला विजयनगरचा राजा रामराय यांच्यात इ.स.१५६५ मध्ये लढाई झाली. या लढाईत त्याचा पराभव झाला. यानंतर विजयनगरचे राज्य संपुष्टात आले.

### बहमनी राज्य

मुहम्मद तुघलकाचे वर्चस्व झुगारून देण्यासाठी दक्षिणेमध्ये सरदारांनी बंड केले. या सरदारांचा प्रमुख हसन गंगू याने दिल्लीच्या सुलतानाच्या सैन्याचा पराभव केला. इ.स.१३४७ मध्ये नवीन राज्य अस्तित्वात आले. यास बहमनी राज्य असे म्हणतात. हसन गंगू हा बहमनी राज्याचा पहिला सुलतान झाला. त्याने कर्नाटक राज्यातील 'गुलबर्गा' येथे आपली राजधानी स्थापन केली.

**महमूद गावान :** हा बहमनी राज्याचा मुख्य

## २. सूर्य, चंद्र व पृथ्वी

टेस्ट सोडवा

## पाठ वाचा व समजून घ्या.


- आता या चेंडूच्या मागे १० ते १५ सेमीवर एक मोठा प्लॅस्टिकचा किंवा रबराचा चेंडू ठेवा. या चेंडूला पृथ्वी माना. त्यावरदेखील मध्यभागी पेन्सिलने वर्तुळ काढा. या वर्तुळाला विषुववृत्त समजा.
- हा चेंडू टेबलावर स्थिर ठेवण्यासाठी शाळेत उपलब्ध असलेल्या रबरी रिंगचा किंवा चुंबळीचा आधार म्हणून वापर करा.
- विषुववृत्तासमोर चंद्रावर काढलेले वर्तुळ येईल, अशी मांडणी करा.
- आता सूर्य म्हणून विजेरी घ्या. ती साधारणतः एक फूट अंतरावर चंद्राच्या सरळरेषेत आडवी धरा.
- विजेरीचा प्रकाश चंद्रावर टाका. आकृती २.७ पहा.
- चंद्राच्या पृथ्वीवर पडणाऱ्या सावलीचे निरीक्षण करून सूर्य ग्रहणाची स्थिती समजून घ्या.

### चंद्रग्रहण :

चंद्र आपल्या परिभ्रमण मार्गावरून जाताना जेव्हा पृथ्वीच्या छायेत प्रवेश करतो, तेव्हा चंद्रग्रहण घडून येते. अशावेळी चंद्र व सूर्य यांच्या दरम्यान पृथ्वी एकाच पातळीत असणे आवश्यक असते. पौर्णिमेच्या रात्री चंद्राचा प्रदक्षिणा मार्ग पृथ्वीच्या दाट सावलीतून जातो. त्यामुळे चंद्र पूर्णपणे झाकला जाऊन खग्रास चंद्रग्रहण होते, तर काही वेळा चंद्र काहीसा झाकला गेल्यामुळे खंडग्रास चंद्रग्रहण होते. (आकृती २.८ पहा.)

### करून पहा.

- सूर्यग्रहणासाठी वापरलेले साहित्य आकृती २.९ प्रमाणे मांडा आणि चंद्रग्रहणाची स्थिती समजून घ्या.




आकृती २.९ : चंद्रग्रहणाची कृती

### जरा डोके चालवा !

- सूर्यग्रहणाच्या दिवशी पृथ्वीवरील कोणत्या भागातून ग्रहण दिसणार नाही ?
- कंकणाकृती आणि खग्रास असे सूर्यग्रहण एकाच वेळी होऊ शकते काय ?
- चंद्रग्रहण कंकणाकृती का दिसणार नाही ?
- चंद्रावर गेल्यास तुम्हांला कोणकोणती ग्रहणे दिसू शकतील ?
- इतर ग्रहांमुळे होणारी सूर्यग्रहणे आपण का पाहू शकत नाही ?

### जरा विचार करा !

- ज्या अमावास्येला सूर्यग्रहण होत नाही, तेव्हा चंद्राला सावलीच नसते का ?




आकृती २.८ : खग्रास व खंडग्रास चंद्रग्रहण

पाठ वाचा व स्वाध्याय सोडवा. सराव

टेस्ट सोडवा

# 1. सजीव सृष्टी : अनुकूलन व वर्गीकरण

वनस्पती व प्राणी सृष्टीतील द्विनाम पद्धतीने वर्गीकरण केलेली काही उदाहरणे पुढे दिली आहेत.

| सजीव | वैज्ञानिक नाव |
|---|---|
| कुत्रा | कॅनिस फॅमिल्यरिस |
| गाय | बोस टॉअरस |
| जास्वंद | हिबिस्कस रोझा-सायनेन्सिस |
| ज्वारी | सॉर्धम व्हलगेर |

याचप्रमाणे आपल्या सभोवताली आढळणाऱ्या प्राण्यांची व वनस्पतींची वैज्ञानिक नावे शोधा व वर्गात चर्चा करा.



29 एप्रिल हा 'जागतिक बेडूक संरक्षण दिवस' आहे. वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार त्यांना मारणे, इजा पोहोचवणे यांवर बंदी आहे.

## स्वाध्याय

1. शोधा पाहू माझा जोडीदार !

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| 1. कमळ | अ. फुले व पाने कीटकांना आकर्षित करतात. |
| 2. कोरफड | आ. अन्नग्रहणासाठी चूषक मुळे असतात. |
| 3. अमरवेल | इ. वाळवंटात राहण्यासाठी अनुकूलित. |
| 4. घटपर्णी | ई. पाण्यात राहण्यासाठी अनुकूलित. |

2. परिच्छेद वाचा व खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा.

मी पेंग्विन, बर्फाळ प्रदेशात राहतो. माझ्या शरीराची पोटाकडील बाजू पांढरी आहे. माझी त्वचा जाड असून त्वचेखाली चरबीचे आवरण आहे. माझे शरीर दोन्ही टोकांना निमुळते आहे. माझे पंख आकाराने लहान आहेत. माझी बोटे पातळ त्वचेने जोडलेली आहेत. आम्ही नेहमी थव्याने राहतो.

अ. माझी त्वचा जाड, पांढऱ्या रंगाची व त्या खाली चरबीचे आवरण कशासाठी असावे ?

आ. आम्ही नेहमी थव्याने एकमेकांना चिकटून का राहतो ?

इ. ध्रुवीय प्रदेशात कायमस्वरूपी वास्तव्य करण्यासाठी तुमच्यामध्ये कोणते अनुकूलन हवे आणि का ?

ई. मी कोणत्या भौगोलिक प्रदेशात राहतो ? का ?

3. खोटे कोण बोलतो ?

अ. झुरळ : मला पाच पाय आहेत.

आ. कोंबडी : माझी बोटे त्वचेने जोडलेली आहेत.

इ. निवडुंग : माझा मांसल हिरवा भाग हे पान आहे.

4. खालील विधाने वाचून त्याआधारे अनुकूलन संदर्भात परिच्छेद लेखन करा.

अ. वाळवंटात खूप उष्णता आहे.

आ. गवताळ प्रदेश हिरवागार असतो.

इ. कीटक जास्त प्रमाणात आढळतात.

ई. आम्ही लपून बसतो.

उ. आमचे कान लांब असतात.

5. खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा.

अ. उंटाला 'वाळवंटातील जहाज' का म्हणतात ?

आ. निवडुंग, बाभूळ व इतर वाळवंटी वनस्पती कमी पाण्याच्या प्रदेशांत सहज का जगू शकतात ?

इ. सजीवांमधील अनुकूलन आणि त्यांच्या सभोवतालची परिस्थिती यांच्यात काय संबंध आहे ?

ई. सजीवांचे वर्गीकरण कसे केले जाते ?

उपक्रम : आदिमानवापासून आजच्या मानवापर्यंत झालेले अनुकूलन कसे घडत गेले असेल, याची माहिती मिळवा.

# 1. The Living World : Adaptations and Classification

Read and solve. Revision

**Following are some examples of organisms from Kingdom Plantae and Animalia classified by the binomial method of nomenclature :**

| Living Things | Scientific Name |
|---|---|
| Dog | *Canis lupus familiaris* |
| Cow | *Bos taurus* |
| Hibiscus | *Hibiscus rosa-sinensis* |
| Jowar | *Sorghum bicolor* |

Find out the scientific names of other animals and plants in your surroundings and discuss in class.



29th April is observed as 'World Frog Protection Day'.

Killing or harming frogs is prohibited by the Wild Life Protection Act.

## Exercise

**1. Find my match !**

| 'A' Group | 'B' Group |
|---|---|
| (1) Lotus | (a) flower and leaves attract insects |
| (2) Aloe | (b) Haustorial roots for absorption of food |
| (3) Cuscuta | (c) Adapted to live in deserts |
| (4) Venus flytrap | (d) Adapted to live in water. |

**2. Read the paragraph and answer the following questions.**

I am a penguin. I live in polar region covered by snow. My abdomen is white. My skin is thick with a layer of fat underneath. My body is spindle-shaped. My wings are small. My toes are webbed. We live in flocks.

(a) Why is my skin white and thick and why is there a thick layer of fat underneath?

(b) Why do we live in flocks sticking close to each other?

(c) Which geographical region do I inhabit? Why?

(d) Which adaptations should you have to enable you to live permanently in the polar region? Why?

**3. Who is lying?**

(a) Cockroach – I have five legs.

(b) Hen – My toes are webbed.

(c) Cactus – My fleshy, green part is a leaf.

**4. Read each of the following statements. Write a paragraph about adaptation with reference to each statement.**

(a) There is extreme heat in deserts.

(b) Grasslands are lush green.

(c) Insects are found in large numbers.

(d) We hide.

(e) We have long ears.

**5. Answer the following.**

(a) Why is the camel called the 'Ship of the desert'?

(b) How can the plants like cactus and acacia live in deserts with scarce water?

(c) What is the inter-relationship between adaptations of organisms and their surroundings?

(d) How are organisms classified?

**Activity :** Find out how the gradual adaptation from primitive man to modern man must have taken place.

♦ ♦ ♦




टेस्ट सोडवा

## खोजबीन

आसपास के पेड़-पौधों के नामों का वर्गीकरण करो :

| छोटे | मध्यम | बड़े |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |



## वाचन जगत से

**रियाज**

संकेत स्थल पर जाकर महाराष्ट्र राज्य के खादी ग्रामोद्योग की जानकारी पढ़ो और मुद्दों के आधार पर भाषण तैयार करो :

कपास → धागा → बुनाई → निर्माण प्रक्रिया → वितरण → विक्रय



## सदैव ध्यान में रखो

प्रत्येक परिस्थिति का सामना हँसते हुए करना चाहिए ।

**१. रिक्त स्थान की पूर्ति करो :**

(क) रात में उनपर ----- चाँद भी,
एक ही-सी ----- है डालता ।

(ख) प्यार डूबी तितलियों के ----- कतर,
भौंर का है वेध देता -----तन ।

**२. एक वाक्य में उत्तर लिखो :**

(च) फूल किनको गोद में लेता है ?

(छ) बड़प्पन की कसर रह जाने पर क्या काम नहीं देती ?

(ज) कौन एक-सा बरसता है ?


(झ) फूल किसको रस पिलाता है ?



## भाषा की ओर

निम्नलिखित वर्णों से समानार्थी और विरुद्धार्थी शब्दों की जोड़ियाँ ढूँढ़ो और अपने वाक्यों में प्रयोग करके कॉपी में लिखो :

L1PQ4Y



## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून

| सातवी मराठी | सातवी गणित | सेमी गणित | सातवी इंग्रजी | सातवी इतिहास |
|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| सातवी भूगोल | सातवी विज्ञान | सेमी विज्ञान | सातवी हिंदी |
|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरून...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरून डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे वेब स्त्रोत-'ई-बालभारती' सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in